संदर्भ :- १. मा.प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग मंत्रालय मुंबई यांचे शासन निर्णय क्र.घरकुल २०१२/प्र.क्र.३८(भाग-१)/का.१७ दिनांक. १२ मार्च.२०१३

२. मा.उप सचिव, आदिवासी विकास विभाग मंत्रालय मुंबई यांचे शासन निर्णय क्र.घरकुल २०१२/प्र.क्र.३८(भाग-१)/का.१७ दिनांक. १५ मार्च.२०१६

३. मा.संचालक रा.व्य.कक्ष -ग्रामीण गृहनिर्माण म.रा.यांचे पत्र क्रं.जा.क्रं.३५२ शबरी उदिष्टपूर्ती/२०१६ दि.२७.०६.२०१६

४. मा.संचालक रा.व्य.कक्ष -ग्रामीण गृहनिर्माण म.रा.यांचे पत्र क्रं.जा.क्रं.३८४ शबरी उदिष्टपूर्ती/२०१६ दि.०७.०७.२०१६

५. मा.आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य नाशिक यांचे पत्र क्र.विकास-२०१५/प्र.क्र.१८/का-३(३)दि.३०/५/२००१६

६. उप सचिव, आदिवासी विकास विभाग यांचे पत्र क्र.घरकुल-२०१६/प्र.क्र.११/का-१७ दिनांक ३० जून २०१६

७. शबरी आदिवासी घरकुल योजना जिल्हास्तरीय समितीची बैठक दिनांक ----------

८. गट विकास अधिकारी, यांचेकडील प्राप्त प्रस्ताव

९. मा.संचालक रा.व्य.कक्ष -ग्रामीण गृहनिर्माण म.रा.यांचे पत्रजा.क्र.राव्यक-ग्रा.गृह/सांख्यिकी/शबरी उद्दीष्ट17-18/379/17 दि. 22/08/17

जा.क्र/923/शबरी घरकुल/ २०१८
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कळमनुरी
जिल्हा हिंगोली.
दिनांक : -16 /04 /२०१८

**प्रशासकीय मान्यता आदेश : -**

शबरी आदिवासी घरकुल योजना (ग्रामीण) सन २०१७-१८ या वर्षाकरिता, पंचायत समिती औंढा ना. हिंगोली,कळमनुरी अंतर्गत सोबत जोडलेल्या यादीतील **एकूण (५३ )** लाभार्थींना घरकुले बांधकामासाठी खालील नियम व अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | तालुका | अनु. जमाती (ST) | एकुण (Total) |
|---|---|---|---|
| 1 | औंढा ना. | 06 | 06 |
| 2 | वसमत | 08 | 08 |
| 3 | हिंगोली | 02 | 02 |
| 4 | कळमनुरी | 37 | 37 |
| 5 | सेनगांव | 00 | 00 |
| **एकुण** | | 53 | 53 |

## नियम व अटी

१. शबरी आदिवासी घरकुल योजना (ग्रामीण)सन २०१७-१८ या घरकुलाचे बांधकाम लाभार्थ्यांच्या मालकीचे जागेत लाभार्थ्यामार्फतच करण्यात यावे.

२. शबरी आदिवासी घरकुल योजना (ग्रामीण) सन २०१७-१८ या घरकुलासाठी किमान २५ चौ.मी.घरकुल बांधकाम क्षेत्रफळ मर्यादा असून त्यावर शासनाचे निकषानुसार बांधकाम करण्यात यावे. या आराखडयामध्ये बदल करावयाचा झाल्यास या कार्यालयाच्या पुर्व परवानगी शिवाय करु नये.सदर घरकुलामध्ये दोन खोल्या बांधाव्यात त्यामध्ये एक स्वयंपाक घर व एक खोली असावी.घर बांधताना शौचालय व बाथरुम बांधकाम करणे बंधनकारक आहे.त्याचबरोबर निर्धुर चूल/एलपीजी गॅस असणे बंधनकारक आहे.

३. शबरी आदिवासी घरकुल योजना (ग्रामीण) सन २०१७-१८ या घरकुलाचे बांधकाम लाभार्थ्यामार्फतच करण्यात यावे. कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता (बांधकाम) पंचायत समिती यांनी बांधकाम सुरु करण्याबाबत प्रस्तावात सुचवलेल्या जागेची पाहणी करुन लाईन आऊट देणे असून लाभार्थ्यांस बांधकामा संबंधित तांत्रिक मार्गदर्शन करावयाचे आहे.अंतिम मुल्यांकन दाखला मिळाल्यानंतर लाभार्थ्यांस अंतिम अनुदान अदाई करावे.मंजूर घरकुलाचे बांधकाम १० दिवसाच्या आत सुरु करावे. तीन महिन्याच्या आत बांधून पूर्ण करण्यात यावे. अन्यथा त्यानंतर दिलेली मंजूरी रद्द करण्यात येईल.

४. शबरी आदिवासी घरकुल योजना (ग्रामीण) सन २०१७-१८ या घरकुलांची संयुक्त मालकी पती-पत्नी दोघांची राहील.मात्र जर लाभधारक अविवाहीत असल्यास लग्नानंतर सदरच्या घरकुलावर दोघांची संयुक्त मालकी आपोआप होईल.

५. शबरी आदिवासी घरकुल योजना (ग्रामीण) सन २०१७-१८ या घरकुलांची ग्रामपंचायत अभिलेख्यात नमुना-८ वर पती व पत्नीच्या नावानेच मालकीची नोंद करण्यात यावी. तसेच बांधलेल्या घरकुलाची नोंद गटस्तरावरील मत्ता नोंदवहीमध्ये त्वरीत घ्यावी.

६. शबरी आदिवासी घरकुल योजना (ग्रामीण) सन २०१७-१८ या घरकुलाचे बांधकाम मजूरांमार्फत मजूरी देवूनच पुर्ण करण्यात यावे. सदरील कामे कंत्राटदारास देता येणार नाहीत. याची जाण लाभधारकासही देण्यात यावी.

७. शबरी आदिवासी घरकुल योजना (ग्रामीण) सन २०१७-१८ या घरकुलाचे बांधकामाबरोबर परिसर सुधाराचीही कामे सुरुवात करावी.

८. शबरी आदिवासी घरकुल योजना (ग्रामीण) सन २०१७-१८ या घरकुलाच्या बांधकामासाठी शासनाने निर्धारीत केलेल्या आर्थिक मर्यादेत राज्य शासन यासह घरकुलाचे बांधकाम शौचालय, निर्धुर चुल,परिसर सुधार या सर्व कामासाठी निधी देय राहिल. सदरील तरतुदीमध्ये शासनाने काही फेरबदल केल्यास त्याप्रमाणे अनुदान देय राहिल, व त्याचे पालन करण्याची जबाबदारी संबंधीत लाभधारक व पंचायत समिती यांचेवर राहिल. तसेच लाभार्थीस अनुदान वितरण हे **PFMS** प्रणालीव्दारेच करण्यात यावे व तसे लाथार्थ्यांना मार्गदर्शन करावे.

९. शबरी आदिवासी घरकुल योजना (ग्रामीण) सन २०१७-१८ या योजनेचा लाभार्थी त्याच गावातील आहे काय याचीही पडताळणी करावी तसेच जर लाभार्थी त्या गावातील नसेल तर तसे त्वरीत या कार्यालयास कळवून गाव बदलून घ्यावे त्याचप्रमाणे यादीमध्ये एकच लाभार्थी दुबार वेगवेगळया गावात आला असल्यास त्याचीही खात्री करावी तसेच लाभार्थीच्या नावात किरकोळ दुरुस्ती असल्यास ग्रामसेवक यांचेकडून त्याच्या मुळ नावाची खात्री करावी.

१०. शबरी आदिवासी घरकुल योजना (ग्रामीण) सन २०१७-१८ या योजनेचा लाभार्थी एकाच कुटुंबातील दोन किंवा अधिक व्यक्तीस वेगवेगळी घरकुले देता येणार नाहीत. तसेच लाभधारकांच्या कुटुंबात कोणत्याही व्यक्तीस अन्य कोणत्याही योजनेतून घरकुलाचा अथवा घरकुलासाठी अनुदानाचा लाभ मिळालेला नसावा. अपात्र लाभधारकांना या योजनेचा लाभ दिला जाणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत **गट विकास अधिकारी व ग्रामसेवक-सरपंच** यांचेवर राहील. याउपरही अपात्र लाभधारकास या योजनेचा लाभ दिला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत **गट विकास अधिकारी व ग्रामसेवक-सरपंच** यांची राहील.

११. शबरी आदिवासी घरकुल योजना (ग्रामीण) सन २०१७-१८ या घरकुलासाठी जागा त्या गावांच्या वस्तीपासून जवळ व लाभधारक त्या जागेत राहण्यास तयार असेल अशीच जागा घरकुल बांधकामासाठी निवडण्यात यावी. व सुरुवातीस जी जागा दाखवली आहे ती जागा कोणत्याही परिस्थितीत बदलता येणार नाही. याबाबत लाभधारकास अवगत करावे. याबाबत लाभार्थी यांनी घरकुल बांधकामासाठी दर्शविलेल्या जागेचे रेखांकन करण्यापूर्वी ०१ फोटो व बांधकाम सुरु झाल्यानंतर ०१ फोटो व घर पुर्ण झाल्यावर ०१ फोटो काढण्यात यावे मोबाईल ॲपद्वारे आवास सॉप्ट प्रणालीवर अपलोड करण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत तांत्रीक अधिकारी व गट विकास अधिकारी यांची राहील.

१२. शबरी आदिवासी घरकुल योजना (ग्रामीण) सन २०१७-१८ या घरकुलाचे बांधकाम स्वतः लाभधारक करीत असेल अशा प्रकरणी संबंधीत लाभधारकाकडून रु.१००/- चे कोर्ट स्टॅम्प पेपरवरती रितसर करारनामा करुन घ्यावा. घरकुलांचे बांधकामे चालू वित्तीय वर्षाच्या आत पुर्ण करण्याची जबाबदारी संबंधित लाभधारक/ग्रामपंचायत/पंचायत समिती यांची राहील. घरकुलाचे बांधकाम एक वर्षाच्या आत पूर्ण न केल्यास संबंधितावर दंडात्मक कार्यवाही / फौजदारी गुन्हा दाखल करण्याची जबाबदारी संबंधित गट विकास अधिकारी यांचेवर राहील.

१३. शबरी आदिवासी घरकुल योजना (ग्रामीण) सन २०१७-१८ या घरकुलाचे मंजूर करण्यात आलेल्या लाभार्थीची यादी ग्रामपंचायतीने त्यांचे सुचना फलकावर लावणे व सर्व संबंधीत लाभधारकांना ग्रामपंचायत स्तरावरुन कळविणे ग्रामपंचायतीवर बंधनकारक आहे.

१४. शबरी आदिवासी घरकुल योजना (ग्रामीण) सन २०१७-१८ या घरकुलाचे लाभार्थी अनुसुचित जमातीचे आहेत अशा लाभार्थीकडून सक्षम अधिका-यांचे ते अनुसूचित जमातीचे आहेत. अशा आशयाचे प्रमाणपत्र हस्तगत करुनच त्यांना मार्कआऊट/बांधकामासाठी परवानगी दयावी. तसेच अपंग लाभार्थी जे अपंगाचे उदिदष्टानुसार मंजूर झालेले आहेत अशा लाभार्थीचे ते अपंग असल्याचे सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र प्राप्त करुन घेवूनच त्यांना बांधकामासाठी परवानगी दयावी.

१५. शबरी आदिवासी घरकुल योजना (ग्रामीण) सन २०१७-१८ या घरकुल बांधकामाचे काम सुरु करण्यापूर्वी ग्रामपंचायत स्तरावर लागणाऱ्या कागदपत्रांची पूर्तता ग्रामसेवकांनी त्वरित संबंधित लाभार्थ्यांशी संपर्क साधून पंचायत समितीकडे करावी.

१६. शबरी आदिवासी घरकुल योजना (ग्रामीण) सन २०१७-१८ या घरकुल बांधकामाचे मार्क आऊट देण्यापुर्वी संबधित लाभार्थीचा घरकुल मागणीचा अर्ज घेणे, त्यामध्ये असे नमुद करावे की मला माझ्या जागेमध्ये कोणतेही पक्के घर नाही.माझ्या जागेचे क्षेत्रफळ ( ) एवढे आहे.

१७. शबरी आदिवासी घरकुल योजना (ग्रामीण) सन २०१७-१८ या लाभार्थीचा अर्ज घेवून मार्क आऊट देण्यापुर्वी पंचनामा करावा. ग्रामसेवक/सरपंच/शा.अ.व इतर पाचपंच, पंचनाम्यामध्ये लाभार्थीकडे कोणतेही पक्के घर नाही. लाभार्थीची स्वतःची जागा उपलब्ध आहे/नाही सबब सदरील लाभार्थी हा घरकुल देण्यास पात्र आहे, याबाबत खातरजमा करावी.

१८. शबरी आदिवासी घरकुल योजना (ग्रामीण) सन २०१७-१८ या लाभार्थी सध्या जेथे राहत आहे त्या झोपडी व कच्च्या घराचे लाभार्थ्यासह छायाचित्र घेणे बंधनकारक राहील. तसेच घरकुलाचे लेंटल स्तरावर व पूर्ण झाल्यांनतर ग्रामसेवक व लाभार्थी यांचे घरासह छायाचित्र घेवून पंचायत समिती दप्तरी ठेवण्यात यावे. तसेच घरकुलाचे फोटो मोबाईल ॲपद्वारे आवास सॉप्ट प्रणालीवर अपलोड करण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत तांत्रीक अधिकारी व गट विकास अधिकारी यांची राहील.

१९. शबरी आदिवासी घरकुल योजना (ग्रामीण) सन २०१७-१८ या घरकुलाचे सर्व मंजूर लाभार्थ्यांची कार्यशाळा जि.प.मतदार संघ निहाय आयोजित करुन शा.अ.विस्तार अधिकारी (पं) व लेखा शाखेकडील कर्मचारी व ग्रामसेवक यांनी त्यांना शबरी आदिवासी घरकुल योजना (ग्रामीण) मार्गदर्शक नियमावलीनुसार मार्गदर्शन करावे.

२०. महाराष्ट्र रोजगार ग्रामीण योजनेतंर्गत शासन निर्णय प्रमाणे अकुशल कामासाठी ९० मनुष्य दिवसाची मजूरी मग्रारोह योजनेच्या प्रचलित नियमानुसार अदाई करावी.

२१. शबरी आदिवासी घरकुल योजना (ग्रामीण) सन २०१७-१८ यामध्ये लाभार्थ्यांची निवड करत असताना कोणत्याही परिस्थितीत नावामध्ये बदल करु नये. तसेच याबाबत बदल घडत असल्यास कारणासह प्रस्तावास या कार्यालयाची पूर्व अनुमती घेण्यात यावी. नावात बदल झाल्यास एखाद्या लाभार्थ्याची तक्रार उदभवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी गट विकास अधिकारी यांच्या कार्यालयाची राहील.

२२. शबरी आदिवासी घरकुल योजना (ग्रामीण) सन २०१७-१८ यामध्ये घरकुल मंजुर झाल्याचे ग्रामसेवक मार्फत लाभार्थ्यास लेखी स्वरुपात कळविण्यात यावे.

२३. कोणत्याही परिस्थितीत गावठाण/गायरान/सरकारी जागेवर घरकुलाचे बांधकाम होणार नाही याची ग्रामसेकवक/सरपंच यांनी दक्षता घ्यावी. असे आढळून आल्यास संबंधीत ग्रामसेवक/सरपंच/कनिष्ठ अभियंता यांच्या विरूध्द प्रशासकिय कार्यवाही प्रस्तावीत केल्या जाईल.

२४. सदर योजने अंतर्गत शासनाकडुन वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश तथा नियम व अटी या गट विकास अधिकारी व लाभधारकास बंधनकारक राहतील.

वरील सर्व अटींची पुर्तता करुनच बांधकामास सुरुवात करावी. वरील कोणत्याही अटींची पुर्तता न करता बांधकाम सुरु केल्यास व पुढे अडचणी उदभवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत गट विकास अधिकारी यांचेवर राहील.

**अध्यक्ष कार्यकारी समिती**
**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हिंगोली.**

**प्रति,**
गट विकास अधिकारी
पंचायत समिती.**औंढा ना./हिंगोली/कळमनुरी.**

**<u>प्रतिलिपी माहितीस्तव व कार्यवाहीस्तव.</u>**

१. मा.विभागीय आयुक्त, आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना सविनय सादर.
२. मा.आयुक्त,आदिवासी विकास विभाग महाराष्ट्र राज्य नाशिक यांना माहितीस्तव.
३. मा. संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृहनिर्माण, मुंबई यांना माहितीस्तव सादर.
४. मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय हिंगोली यांना माहितीस्तव सविनय सादर.
५. उप अभियंता (बांध/लपा/ग्रापापू) जि.प. उप विभाग ---------------जिल्हा परिषद, हिंगोली.
६. लेखा विभाग प्रस्तुत कार्यालय यांना देवून सुचित करण्यात येते की, उक्त नमूद लाभार्थीना निधी PFMS प्रणालीव्दारेच अदाई बाबतची आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.
७. संगणक प्रोग्रामर यांना देवून सुचित करण्यात येते की, सदर मंजुर लाभार्थींची यादी आवास सॉफ्ट प्रनालीवर अचुक नोंद करावी व सर्व तालुक्यामध्ये सुरू असलेल्या आवास सॉफ्टच्या कामावर नियंत्रण ठेवून वेळोवेळी त्यांना मार्गदर्शन करावे व दररोजच्या कामाची स्थिती आवास सॉफ्ट प्रनालीवर करून घ्यावी व त्याचा अहवाल दररोज सादर करावा त्याची एक प्रत आपल्याकडील संचिकेत ठेवावी.

**अध्यक्ष कार्यकारी समिती**
**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हिंगोली**

## सन 2017-18 मध्ये प्रशासकीय मान्यता करीता तयार यादी

| अ.क्र | यादितीलअ. क्र. | PO Office कळमनुरी यादीतील गावें | तालुका | PO Office कळमनुरी यादीतील व ग्रामसभा ठरावातील लाभार्थी नांवे |
|---|---|---|---|---|
| | **शबरी आदिवासी घरकुल योजना (ग्रामीण) सन 2017-18 मंजुर यादी** | | | |
| अ. क्र. | यादितीलअ. क्र. | गावाचे नांव | तालुका | लाभार्थ्यांचे नांव |
| 1 | 46 | राजापूर | औंढा ना. | सटवाजी कान्होजी चिरमाडे |
| 2 | 58 | आसोला तर्फे लाख | औंढा ना. | प्रयागबाई कचरु आसोले |
| 3 | 69 | जलालदाभा | औंढा ना. | महिपती चंपती गारोळे |
| 4 | 108 | पिंपळदरी | औंढा ना. | आनंदराव लिंबाजी बेले |
| 5 | 156 | काकडदाभा | औंढा ना. | रामचंद्र देवबा काळे |
| 6 | 157 | काकडदाभा | औंढा ना. | तुकाराम दत्तराव काळे |
| 7 | 193 | पेडगांव/मलाई | हिंगोली | लोडबा दशरुजी बोडखे |
| 8 | 194 | पेडगांव/मलाई | हिंगोली | मारोती दत्तराव वाळके |
| 9 | 214 | पेठवडगांव | कळमनुरी | बालाजी उत्तम पिंपरे |
| 10 | 226 | पार्डी | कळमनुरी | देवराव तुकाराम डाखोरे |
| 11 | 232 | पार्डी | कळमनुरी | माधव डिगांबर वाघडव |
| 12 | 233 | महालिंगी | कळमनुरी | वानोळे पुरभाजी नागोराव |
| 13 | 234 | महालिंगी | कळमनुरी | विश्वनाथ दादाराव अंभोरे |
| 14 | 235 | महालिंगी | कळमनुरी | रमेश ग्यानोबा आंभोरे |
| 15 | 256 | मोरवड | कळमनुरी | दता शिताराम डवले |
| 16 | 257 | मोरवड | कळमनुरी | आनंदराव फुलाजी बुरकुले |
| 17 | 271 | मोरवाडी | कळमनुरी | नामदेव लक्ष्मण आमले |
| 18 | 291 | रामवाडी | कळमनुरी | सखाराम धोडबा डाखोरे |
| 19 | 292 | रामवाडी | कळमनुरी | दशरथ सखाराम डाखोरे |
| 20 | 293 | रामवाडी | कळमनुरी | कुंडलिक सखाराम डाखोरे |
| 21 | 314 | घोळवा | कळमनुरी | अर्जुन कोंडबा खुडे |
| 22 | 324 | निमटोक | कळमनुरी | देवराव रत्नाजी खिल्लारे |
| 23 | 325 | निमटोक | कळमनुरी | काशिनाथ विठ्ठल लाखाडे |
| 24 | 340 | धानोरा | कळमनुरी | रंगराव गणपतराव कांबळे |
| 25 | 347 | आ.बाळापूर | कळमनुरी | दिगांबर मारोती खरोडे |
| 26 | 360 | आसोलवाडी | कळमनुरी | के शव कान्हू काळे |
| 27 | 361 | आसोलवाडी | कळमनुरी | मोतीराम ज्योतीबा गुव्हाडे |
| 28 | 386 | जामगव्हाण | कळमनुरी | नागुबाई बाबाराव टारफे |
| 29 | 387 | जामगव्हाण | कळमनुरी | उत्तम काळोजी वानोळे |
| 30 | 404 | वारंगा फाटा | कळमनुरी | गजानन प्रभाबर बुरकुले |
| 31 | 429 | वाई | कळमनुरी | भिमराव कान्होजी वागतकर |
| 32 | 442 | भुरक्याची वाडी | कळमनुरी | यादवराव महादजी भुरके |

## शबरी आदिवासी घरकुल योजना (ग्रामीण) सन 2017-18 मंजुर यादी

| अ. क्र. | यादितीलअ. क्र. | गावाचे नांव | तालुका | लाभार्थ्याचे नांव |
|---|---|---|---|---|
| 33 | 443 | भुरक्याची वाडी | कळमनुरी | बसाजी वामन वानोळे |
| 34 | 457 | सुकळीवीर | कळमनुरी | सुमन कोंडबा खराडे |
| 35 | 466 | कुंभारवाडी | कळमनुरी | किसन तोलाजी आमले |
| 36 | 485 | नरवाडी | कळमनुरी | भाऊराव चंपती फोले |
| 37 | 486 | नरवाडी | कळमनुरी | होनाजी वामन फोले |
| 38 | 499 | चिंचोर्डी | कळमनुरी | शिवाजी यादोजी कराळे |
| 39 | 515 | खापरखेडा | कळमनुरी | मारोती संभाजी आसोले |
| 40 | 516 | खापरखेडा | कळमनुरी | नामदेव सैनाजी वाळके |
| 41 | 528 | गारोळयाचीवाडी | कळमनुरी | सत्यभामा लिंबाजी ढोके |
| 42 | 540 | कवडा | कळमनुरी | सुभाष लक्ष्मण खुडे |
| 43 | 553 | तरोडा | कळमनुरी | जनार्धन सुभाष भिसे |
| 44 | 554 | तरोडा | कळमनुरी | परशराम दगडुजी पानबुडे |
| 45 | 566 | बेलथर | कळमनुरी | कैलास लोभाजी क-हाळे |
| 46 | 120 | मरसुळ | वसमत | जनार्धन रूस्तुमराव रिठे |
| 47 | 123 | मरसुळ | वसमत | विठ्ठल नारायण गुव्हाडे |
| 48 | 124 | मरसुळ | वसमत | सुभाष सिताराम साबळे |
| 49 | 132 | मरसुळ | वसमत | वामन शामराव गायकवाड |
| 50 | 143 | मरसुळ | वसमत | साहेबराव शामराव गायकवाड |
| 51 | 146 | मरसुळ | वसमत | रावजी लिंबाजी गुव्हाडे |
| 52 | 151 | मरसुळ | वसमत | दादाराव पांडोजी गायकवाड |
| 53 | 153 | मरसुळ | वसमत | लक्ष्मण गोमाजी साबळे |

**सदस्य सचिव तथा**
प्रकल्प अधिकारी,
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,
कळमनुरी जि.हिंगोली

**अध्यक्ष तथा**
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, हिंगोली.

सदस्य
प्रकल्प संचालक
जिल्हा ग्रमिण यंत्रणा ,हिंगोली